# भूमिगत मुंबई मेट्रो-३ ची यशस्वी चाचणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

भारतातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका असलेल्या मेट्रो-३ ची मुंबई मेट्रो कॉर्पोरेशनने शनिवारी यशस्वी चाचणी केली. एमआयडीसी ते विद्यानगरीदरम्यान ही चाचणी घेण्यात आली होती. यामुळे डिसेंबरपर्यंत हा मार्ग सुरू केला जाणार असल्याच्या आशा वाढल्या आहेत.

मेट्रो-३ हा पहिला भूमिगत प्रकल्प असून ॲक्वा लाईन म्हणून ओळखली जाते. या मार्गाचे दोन टप्प्यांत काम केले जात आहे. यातील पहिला टप्पा आरे ते बीकेसी असून दुसरा टप्पा हा कफ परेड ते आरे असा आहे. या मार्गाची एकूण लांबी ३५.६ किमी आहे.

यातील पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून त्यावर मेट्रोने चाचणी घेतली. एमआयडीसी ते विद्यानगरी मेट्रो स्टेशनदरम्यान धावली. या दरम्यान ट्रेनने सुमारे १७ किमी अंतर कापून सीप्झपर्यंत परतीचा प्रवास केला.

**मेट्रो-३मुळे या स्थानकांना कनेक्टिव्हिटी**

मुंबई मेट्रो लाईन-३ उपनगरीय रेल्वेशी कनेक्टिव्हिटी प्रदान करणार आहे. मुंबई मेट्रोच्या लाईन ३ वर इंटरचेंज असलेली स्टेशन्स खालीलप्रमाणे आहेत:

चर्चगेट-वेस्टर्न लाईन, सीएसएमटी मेट्रो - सेंट्रल लाईन, हार्बर लाईन, ग्रँट रोड - वेस्टर्न लाईन, मुंबई सेंट्रल मेट्रो - वेस्टर्न लाईन,महालक्ष्मी - वेस्टर्न लाईन, मोनोरेल, दादर - वेस्टर्न लाईन, या स्थानकांवर प्रवाशांना सरळ जाता येणार आहे, तर येणाऱ्या काळात निर्माण होणाऱ्या बीकेसी मेट्रो लाईन२, मेट्रो लाईन ७ यांनासुद्धा कनेक्टिव्हिटी मिळणार आहे.



**मुंबई :** एमआयडीसी ते विद्यानगरी या मेट्रो स्थानकादरम्यान धावलेल्या मेट्रो-३ मधून या प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी प्रवास केला. हा सुखद अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले.